(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XII / Issue – III ISSN 2277-8063

# सातारा नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधीची भूमिका : एक अभ्यास

**गायत्री अरुण चव्हाण** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा तालुका -जावली, जिल्हा -सातारा

---

**प्रस्तावना :**

भारतीय लोकशाहीत ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण मिळाले. यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणात महिलांचा सहभाग वाढला आहे. सातारा जिल्हा हा ऐतिहासिकदृष्ट्या क्रांतीकारकांचा आणि समाजसुधारकांचा जिल्हा आहे. सातारा नगरपालिकेत निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधी केवळ 'नामधारी' आहेत की त्या धोरणनिर्मितीत सक्रिय सहभाग नोंदवत आहेत, याचा अभ्यास करणे या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. त्यांच्यासमोर असलेली आव्हाने आणि त्यांनी घडवून आणलेला बदल हा या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- सातारा नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींच्या सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
- महिला लोकप्रतिनिधींच्या निर्णय प्रक्रियेतील सहभागाचे स्वरूप तपासणे.
- नगरपालिकेच्या कामकाजात महिलांना येणाऱ्या अडचणी आणि आव्हाने शोधणे.
- महिला लोकप्रतिनिधींनी राबविलेल्या विकासकामांचे मूल्यमापन करणे.

**संशोधन पद्धती :**

या संशोधन लेखासाठी 'वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक' संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. यात प्राथमिक साधने सातारा नगरपालिकेतील महिला सदस्यांच्या मुलाखती घेणे, प्रश्नावली भरणे आणि प्रत्यक्ष निरीक्षण करणे. तर दुय्यम साधने नगरपालिकेचे वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रातील बातम्या, सरकारी गॅझेट्स, जुने ग्रंथ आणि इंटरनेटवरील माहितीचा वापर केला आहे.

**विषय विवेचन :**

७४ व्या घटनादुरुस्तीनंतर सातारा नगरपालिकेत महिलांना मिळालेल्या ५०% आरक्षणाचा त्यांच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाला, तसेच निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका किती प्रभावी आहे.

**सातारा नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींचे राजकीय सहभाग :**

सातारा नगरपालिकेच्या ऐतिहासिक वाटचालीत महिलांच्या सहभागाचा प्रवास आरक्षित जागांच्या मर्यादित प्रतिनिधित्वाकडून थेट नगराध्यक्षपदाच्या निर्णायक भूमिकेपर्यंत विस्तारलेला दिसतो. १९५२ मध्ये केवळ ३ जागांवरून सुरू झालेला हा प्रवास १९९२ च्या घटनादुरुस्तीनंतर आणि 'महिला व बालकल्याण समिती'च्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने प्रशासकीय प्रक्रियेत सक्रिय झाला, ज्याचे नेतृत्व प्रथम रजनी रामचंद्र कदम यांनी केले. १९७२ मध्ये सुशिला बेगमपुरे यांनी पहिल्या महिला नगराध्यक्षा होण्याचा मान मिळवला, तर पुढील काळात रंजना रावत आणि माधवी कदम यांनी थेट जनतेतून निवडून येऊन महिला नेतृत्वाची ताकद सिद्ध केली. सातारा पालिकेच्या राजकारणात जरी उदयनराजे भोसले आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या आघाड्यांचे आणि राजघराण्याचे वर्चस्व राहिले असले, तरी २०१६ च्या निवडणुकीत माधवी कदम यांनी प्रस्थापित राजघराण्यातील उमेदवाराचा पराभव करून सामान्य कुटुंबातील महिलाही सक्षमपणे नेतृत्व करू शकतात हे दाखवून दिले. २०१० ते २०१३ या कालखंडात अनेक महिलांना नगराध्यक्षपदाची संधी मिळणे हे स्थानिक पातळीवर महिलांच्या वाढत्या राजकीय प्रभावाचे द्योतक आहे. मात्र, या प्रवासात आजही धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत पुरुषी वर्चस्व आणि तांत्रिक बाबींमधील कौटुंबिक हस्तक्षेप ही प्रमुख आव्हाने आहेत. तरीही, आरोग्य, शिक्षण आणि नागरी सुविधांच्या क्षेत्रात महिला प्रतिनिधींनी बजावलेली कामगिरी ही सातारा नगरपालिकेच्या सर्वांगीण विकासातील एक महत्त्वपूर्ण क्रांती ठरली आहे.

**सातारा नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींचे भूमिकेचे विश्लेषण :**

सातारा नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, ५०% आरक्षणामुळे स्थानिक राजकारणात महिलांचा सहभाग केवळ संख्यात्मक न राहता तो गुणात्मकरीत्या वाढत आहे. या प्रक्रियेत ३१ ते ४० या तरुण वयोगटातील महिलांचे प्रमाण सर्वाधिक (५७.५८%) असून, ७०% महिलांना राजकारणात येण्यापूर्वी बचत गट व महिला मंडळांच्या माध्यमातून सामाजिक कार्याचा अनुभव होता, जो त्यांच्या नेतृत्वाचा भक्कम पाया ठरला आहे. सामाजिक स्तरावर इतर मागासवर्गीय (OBC) महिलांचे प्रतिनिधित्व सर्वाधिक

असून, बहुतांश महिला गृहिणी असतानाही सार्वजनिक कर्तव्ये समर्थपणे बजावत आहेत. प्रशासकीय कामकाजात त्या सक्रिय असून १००% महिला प्रतिनिधींनी पाणीपुरवठा, स्वच्छता आणि महिला सुरक्षा यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देऊन 'संवेदनशील नेतृत्व' सिद्ध केले आहे. मात्र, या प्रवासात काही आव्हानेही स्पष्टपणे जाणवतात; सत्तेत असूनही ५४.५५% महिलांच्या कामात कुटुंबाचा हस्तक्षेप आढळतो, तर स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या आर्थिक निर्णय प्रक्रियेत महिलांची उपस्थिती केवळ १८.१९% इतकी अल्प आहे. प्रशासकीय स्तरावर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मिळणारे असहकार्य आणि तांत्रिक प्रशिक्षणाचा अभाव हे त्यांच्या स्वायत्ततेपुढील मुख्य अडथळे आहेत. यावर उपाय म्हणून महिलांना आर्थिक व तांत्रिक समित्यांमध्ये अधिक संधी देणे, प्रशासकीय कार्यशाळा आयोजित करणे आणि राजकीय पक्षांनी त्यांना केवळ आरक्षणापुरते मर्यादित न ठेवता संघटनात्मक नेतृत्व बहाल करणे गरजेचे आहे. एकंदरीत, सातारा नगरपालिकेतील महिलांचा हा प्रवास 'आरक्षणातून सक्षमीकरणाकडे' आश्वासकपणे सुरू असला, तरी प्रत्यक्ष अधिकार गाजवताना त्यांना अजूनही पुरुषप्रधान मानसिकतेशी संघर्ष करावा लागतो.

**निष्कर्ष :**

सातारा नगरपालिकेतील महिलांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, स्थानिक राजकारणात महिलांचे पाऊल आरक्षणापलीकडे जाऊन स्वकर्तृत्वाकडे वळत आहे. साताऱ्यातील ५७.५७% महिलांनी पहिल्यांदाच निवडणूक लढवली असली, तरी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या पण स्वतःच्या हिमतीवर निवडून आलेल्या महिलांची संख्या लक्षणीय आहे, जे लोकशाहीच्या प्रगल्भतेचे लक्षण आहे. बहुसंख्य महिला प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर प्रस्थापित राष्ट्रीय पक्षांच्या पाठिंब्याने सक्रिय आहेत, तर अपक्ष उमेदवारांचे प्रमाण नगण्य आहे. राजकीय सहभागात सातत्य राखणाऱ्या आणि दोन किंवा अधिक वेळा निवडून येणाऱ्या महिलांचे प्रमाण कमी असल्याने, राजकारणात दीर्घकाळ टिकून राहणे हे त्यांच्यापुढील मोठे आव्हान आहे. महिला लोकप्रतिनिधी नगरपालिका बैठकांना नियमित उपस्थित राहतात आणि केवळ उपस्थित न राहता आपल्या प्रभागातील विकासकामांची लेखी आणि तोंडी मागणी करण्यात त्या १००% सक्रिय आहेत. वार्षिक अंदाजपत्रक (Budget) आणि धोरणात्मक चर्चांमध्ये त्यांचा सहभाग आश्वासक आहे, मात्र तांत्रिक विषयांच्या सखोल चर्चेत त्यांना अधिक मार्गदर्शनाची गरज आहे. राजकीय प्रवासात कुटुंबाचा आधार आणि पक्षाचे प्रोत्साहन महत्त्वाचे असले, तरी प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत आणि अंमलबजावणीत त्यांना राजकीय पक्षश्रेष्ठींचा हस्तक्षेप आणि पुरुष सदस्यांच्या संमिश्र सहकार्याचा सामना करावा लागतो. आरक्षणाने मिळालेल्या संधीचा वापर करून या महिलांनी प्रशासनात एक 'लिंग-संवेदनशील' दृष्टिकोन निर्माण केला असून, त्या केवळ त्यांच्या वॉर्डाचे नव्हे, तर महिलांच्या प्रश्नांचे प्रभावी प्रतिनिधित्व करत आहेत.

**संदर्भ सूची**

१. पळशीकर, सुहास (२०१४), *भारतीय लोकशाही*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

२. सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल (२०२०-२०२४).

३. महाराष्ट्र शासन, *नगरपालिका प्रशासन मार्गदर्शिका*.

४. विविध मराठी दैनिके (सकाळ, लोकमत, पुढारी) - सातारा आवृत्ती.

५. डॉ. आंबेडकर, बी. आर., *महिला सक्षमीकरण आणि कायदे*.

६.मुलाखत अनुसूची : सातारा नगरपालिकातील लोकप्रतिनिधी